आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

शुक्रवार, दिनांक ०६ ऑक्टोबर २०२३

ठळक बातम्या

- भारतीय रिझर्व बँकेचा वित्त आणि पत धोरणाचा द्वैमासिक आढावा प्रसिद्ध, रेपोदर साडे सहा टक्कक्यांवर कायम.
- विकासाच्या योजनांमुळे राज्यातील नक्षलग्रस्त भागाचा चेहरामोहरा बदलत असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे केंद्रीय गृह विभागाच्या बैठकीत प्रतिपादन.
- ५ हजारावर पूरग्रस्तांच्या खात्यामध्ये सानुग्रह अनुदान जमा, दररोज टप्प्याटप्प्याने निधी जमा होणार असल्याची नागपूर जिल्हा प्रशासनाची माहिती.

आणि

- सर्व सामान्यांना हक्काची घरे देण्यास शासन वचनबद्ध- गृहनिमार्ण मंत्री अतुल सावे यांचे नागपूरात आश्वासन.

********

रिझर्व्ह बँक

भारतीय रिझर्व बँकेनं वित्त आणि पत धोरणाचा द्वैमासिक आढावा आज प्रसिद्ध केला. या आढाव्यात व्याज दर स्थिर ठेवण्याचा निर्णय वित्त आणि पत धोरण विषयक समितीने एकमतानं घेतल्याचं म्हटलं आहे. त्यामुळे रेपोदर पूर्वीप्रमाणेच साडे सहा टक्कक्यांवर कायम राहिल. इतर व्याजदरातही बदल झालेला नाही. गेल्या ३ आढाव्यांमधेही व्याजदर बदलले नव्हते. जुलै महिन्यात टोमॅटो आणि इतर भाज्यांचे दर वाढल्याने चलन फुगवटा निर्देशांकात वाढ झाली. मात्र ऑगस्ट आणि सप्टेंबर मधे दरवाढ निवळली. या दोन महिन्यात अन्न आणि इंधन वगळता इतर उत्पादनांच्या ग्राहक मूल्य निर्देशांकात घट झाली असल्याचं रिझर्व बँकेनं म्हटलं आहे. मात्र यंदाच्या खरीप हंगामात पाऊस काहीसा कमी झाल्यामुळे कडधान्य आणि तेलबियांच्या उत्पादनांवर मंदीचं सावट आहे तसंच जागतिक स्तरावर अन्न आणि इंधनाच्या दरात सतत चढ-उतार होत असून त्याचाही परिणाम देशातल्या महागाई निर्देशांकावर होऊ शकता.

२०२३-२४ या वर्षासाठी रिझर्व बँकेनं स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर साडेसहा टक्के राहील, असा अंदाज वर्तवला आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत जीडीपी वाढीचा दर ६ पूर्णांक ६ दशांश टक्के राहील, असाही अंदाज रिझर्व बँकेनं वर्तवला आहे. वैयक्तिक हमीवर घेतलेल्या जाणाऱ्या कर्जाबाबत रिझर्व बँकेचे गव्हर्नर शक्तीकांत दास यांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे. बँका आणि बँकां खेरीजच्या वित्तीय कंपन्यांनी ही कर्ज देताना जोखमीच्या दृष्टीने योग्य ती काळजी घ्यावी, असं दास यांनी सांगितलं.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

एकीकडे नक्षलवाद्यांचा प्रतिबंध करताना दुसरीकडे गेल्या वर्षभरात नक्षलग्रस्त भागात विविध विकासाच्या योजना परिणामकारकपणे राबविणे सुरु असल्याने गडचिरोली सारख्या भागातील नक्षलवाद पूर्णपणे संपवण्यात आम्ही लवकरच यशस्वी होऊ, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. ते आज दिल्लीतील विज्ञान भवनात गृह मंत्रालयाने आयोजित केलेल्या डाव्या विचारसरणीमुळे निर्माण झालेल्या उग्रवादाच्या परिस्थितीबाबत आयोजित बैठकीत बोलत होते. केंद्रीय गृह मंत्री अमित शाह बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. या बैठकीस राज्याचे उप मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीसही उपस्थित होते. यावेळी बोलताना मुख्यमंत्री शिंदे यांनी नक्षल प्रभावित भागात रेल्वेचे जाळे पसरविण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. ते म्हणाले की, गडचिरोली, छत्तीसगड आणि तेलंगणा या सीमावर्ती भागात रेल्वेचे जाळे विकसित केले, तर त्याचा विकासासाठी खूप फायदा होईल. तेलंगणातील मंचेरियल ते सिरोंचा आणि पुढे छत्तीसगडमधील भोपाळपट्टणम ते जगदलपूरपर्यंत त्याचप्रमाणे, अहेरी ते शिरपूर (कागजनगर) रेल्वे नेटवर्क विकसित केले, तर सूरजागडच्या पोलाद प्रकल्पाला आणि एकूणच विकासाला फायदा होईल. नक्षलग्रस्त भागात विशेष पायाभूत सुविधांसाठी ५७ कोटी ५० लाख निधीस मंजुरी दिल्याबद्दल केंद्राचे आभार मानून मुख्यमंत्री म्हणाले की, नक्षलवाद्यांची पकड खिळखिळी करण्यासाठी पुढील दोन वर्षांत अधिक तीव्रतेने ऑपरेशन करण्यात येईल. राज्याने गडचिरोली जिल्ह्यात खाणकामाला परवानगी दिली असून सूरजागड खाणीचे काम सुरू झाल्यामुळे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष ५ हजार लोकांना रोजगार उपलब्ध होत आहे लॉयड मेटल्स लिमिटेडच्या माध्यमातून २० हजार कोटी खर्चून एकात्मिक स्टील

प्लांट उभारला जात आहे, ज्यामुळे ७ हजार लोकांना रोजगार मिळेल अशी माहितीही मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली.

उद्धव ठाकरे

नांदेडच्या शासकीय रुग्णालयात रुग्णांच्या मृत्यू प्रकरणी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्य सरकारवर टीका केली आहे. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. कोरोना काळात महाविकास आघाडीच्या याच आरोग्य यंत्रणेनं सक्षम काम केलं होतं, आपल्या सरकारनंतर राज्याची दूर्दशा झाल्याचं ठाकरे म्हणाले. औषधांचा पुरवठा होत नाही, हा रुग्णालयांचे अधिष्ठाता किंवा डॉक्टरांचा दोष नाही, यासंदर्भात केंद्रीय अन्वेषण विभाग- सीबीआय चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी ठाकरे यांनी यावेळी केली. दरम्यान, वैद्यकीय महाविद्यालयात घेणाऱ्या मृत्यूवर राजकारण बंद करण्याची प्रतिक्रिया एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली आहे.

गोरेगाव भीषण आग

मुंबईत गोरेगाव इथं इमारतीत लागलेल्या आगीत सात जणांचा होरपळून मृत्यू झाल्याप्रकरणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दु:ख व्यक्त केलं आहे. मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी दोन लाख रुपये, तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपये मदत, पंतप्रधान राष्ट्रीत मदत निधीतून दिली जाणार असल्याचं, त्यांनी जाहीर केलं आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील या घटनेबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे. आज नवी दिल्ली इथं माध्यम प्रतिनिधींशी बोलताना मुख्यमंत्र्यांनी, या घटनेत मृत्यूमुखी झालेल्यांच्या कुटुंबियांना, प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली. दुर्घटनेतल्या जखमींचा खर्च राज्य सरकार करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. या दुर्घटनेची चौकशी करण्याचे आदेशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. या घटनेत ५८ जण जखमी झाले आहेत, तर पाच जणांची प्रकृती चिंताजनक आहे. अग्निशमन दलाने आगीवर नियंत्रण मिळवल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

सानुग्रह अनुदान

नागपूर महानगरात २३ सप्टेंबरला झालेल्या ढगफुटी सदृश्य मुसळधार पावसाने क्षतीग्रस्त झालेल्या नागरिकांच्या खात्यामध्ये गुरुवार ५ ऑक्टोबरपासून दहा हजार रुपयांचे सानुग्रह अनुदान जमा होणे सुरु झाले आहे. दररोज टप्प्याटप्प्याने निधी जमा होईल,असे जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे. आतापर्यंत २२ हजार ८३४ पंचनामे पूर्ण झाले असून जवळपास ही प्रक्रिया पूर्ण झाली आहे. काही ठिकाणी

सुटलेल्या घरांचे पंचनामे पुन्हा सुरू असल्याचे जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले. २३ सप्टेंबरला महानगरात निर्माण झालेल्या परिस्थितीचे पंचनामे करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने महानगरपालिका प्रशासनाची मदत घेतली आहे. सर्व भागातील पंचनामे तातडीने पूर्ण व्हावे, यासाठी सध्या ५० चमू कार्यरत आहेत. जवळपास १८० कर्मचारी दररोज युद्धपातळीवर पंचनामाचे काम करत आहे. दरम्यान, ज्यांचे पंचनामे झाले नाही त्यांनी संयम ठेवावा. प्रशासनाकडून सर्वांचे पंचनामे करण्यात येतील, तसेच पंचनामा झालेल्या परिवाराच्या खात्यामध्ये सानुग्रह निधी टप्प्याटप्प्याने जमा होईल.प्रत्येकाच्या खात्यात हा निधी टप्प्याटप्प्याने जमा होणार आहे. याबद्दल कोणत्याही अफवांना बळी पडू नये, असेही नागपूर जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

अतुल सावे

सामान्य माणसाला हक्काचे घर मिळावे यासाठी राज्य शासन वचनबध्द असून त्यादिशेने कार्य सुरू आहे. तसेच, इतर मागास विकास विभागाच्यावतीने राज्यात दहा लाख घरे बांधण्याचे कार्य सुरू आहे. या दोन्ही अभियानामध्ये रियल इस्टेट क्षेत्रातील कंपन्यांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन करत या क्षेत्रातील कंपन्यासमोर असलेल्या अडचणी दूर करण्यासाठी लवकरच बैठक घेण्यात येईल, असे प्रतिपादन राज्याचे गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी आज नागपूर इथं केल. येथील रेशीमबाग मैदानावर नॅशनल रियल इस्टेट डेव्हलपमेंट कॉन्सिल- (नरेडको) विदर्भ यांच्यावतीने आयोजित होमेथॉन प्रॉपर्टी एक्सपोचे उद्घाटन श्री. सावे यांच्या हस्ते झाले यावेळी ते बोलत होते. इतर मागास प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकासाठी इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभागाच्यावतीने ‘मोदी आवास घरकुल योजना’ राबविण्यात येत असून या योजनेंतर्गत राज्यात 10 लाख घरे बांधण्यात येणार आहेत. जिल्हा परिषद व अन्य विभागाच्यावतीने ग्रामीण व शहरी भागांमध्ये ही घरे बांधण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. नागपूर शहरात पायाभूत सुविधांचे जाळे मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. होमेथॉन प्रॉपर्टी एक्सपोमध्ये विदर्भासह राज्यातील एकूण 70 रियल इस्टेट कंपन्या सहभागी झाल्या असून 6 ते 8 ऑक्टोबरपर्यंत हा एक्सपो सर्वांसाठी खुला राहणार आहे.

## दिव्यांग कल्याण विभाग

संपूर्ण देशात सर्वप्रथम महाराष्ट्राने दिव्यांग मंत्रालय सुरू केले आहे. दिव्यांग मंत्रालय हा शासनाचा ऐतिहासिक निर्णय आहे. यामध्यमातून दिव्यांगांना सशक्त करण्यात येईल, असे प्रतिपादन दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांच्या दारी अभियानाचे अध्यक्ष व मुख्य मार्गदर्शक बच्चू कडू यांनी बुलडाण्यात केले. दिव्यांग कल्याण विभागातर्फे आयोजित 'दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांच्या दारी' अभियान बुलढाणा शहरात आज, सहकार विद्या मंदिराच्या सांस्कृतिक सभागृहात पार पडले. दिव्यांगांना अंत्योदय कार्ड वितरित करण्यासाठी पुढाकार घ्यावा, यामुळे दिव्यांगाना मदत देणे शक्य होईल. शासनाने कोतवाल भरती जाहिर केली आहे. यामुळे दिव्यांगांना आरक्षण नाही, मात्र जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेऊन कोतवाल आणि कंत्राटी भरतीमध्ये दिव्यांगाना सामावून घ्याव असे आवाहन बच्चू कडू यांनी यावेळी केले.

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नागपूरच्या इतिहासात प्रथमच नागपूरच्या खेळाडूने आशियाई खेळामध्ये सुवर्णपदक पटकाविण्याचा विक्रम केला आहे. यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ओजस देवतळेच्या आई-वडिलांशी संवाद साधून आनंद व्यक्त केला. त्याचे कौतुक केले. आशियाई गेम्समध्ये नागपूरच्या ओजस देवतळे याने बुधवारी आर्चरी मिक्स टीम कपांऊंड इव्हेंटमध्ये भारताला सुवर्णपदक मिळवून दिले.तर गुरूवारी आर्चरी मेन्स कंपाऊंड टीम इव्हेंटमध्ये सुद्धा भारताला सुवर्णपदक मिळवून दिले.

*****